# विस्तार शिक्षण संचालनालय
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला

फोन ०७२४ २२५८१८४ email : deepdkv@yahoo.com फॅक्स ०७२४ २२५८७१२


## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात राज्यस्तरीय भव्य कृषि प्रदर्शनीचे आयोजन

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, कृषि विभाग महाराष्ट्र शासन व आत्मा, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२४ व्या जयंती निमित्य राज्यस्तरीय भव्य कृषि प्रदर्शनीचे आयोजन दिनांक २७ ते ३१ डिसेंबर २०२२ दरम्यान विद्यापीठ क्रिडांगण, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला येथे करण्यात येणार आहे. या प्रदर्शनीत फळबाग, भाजीपाला, फुलशेती, वनौषधी, कापूस, ज्वारी, गहू, कडधान्य, तेलबिया,पाणलोट विकास, ऊस, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, कृषि अभियांत्रिकी ईत्यादी विभागाची दालने तसेच ईतर सलंग्न संस्थासह, कृषि निविष्ठा व कृषि औजारे यांची दालने सुध्दा राहणार आहे. दि. २७ ते ३१ डिसेंबर दरम्यान दररोज दुपारी २.०० ते ४.०० वाजता शास्त्रज्ञ-शेतकरी सुसंवाद, प्रगतीशील शेतकऱ्यांचे मनोगत व मान्यवरांच्या संबोधनाचे आयोजन करण्यात येत आहे. **या प्रदर्शनीतील कृषि पुरक व्यवसाय दालने तथा कृषि प्रक्रिया उद्योगातील दालने प्रदर्शनीस भेट देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रेरणादाई तसेच शेतकऱ्यांचे मनोबल उंचविण्यासाठी सहाय्यभूत ठरणार आहे. ही दालने या कृषि प्रदर्शनीतील मुख्य आकर्षण आहे.** या शिवाय गट शेती, करार शेती, स्वयं सहायता बचत गटांच्या यशोगाथा, महिला बचत गटांनी उत्पादित केलेले कृषि आधारीत उत्पादने, शेतकऱ्यांनी तयार केलेली नाविन्यपूर्ण शेती अवजारे इत्यादींची अभिनव दालने सुध्दा उपलब्ध राहणार आहेत. एकंदरीत या प्रदर्शनीत ३०० च्या जवळपास दालने उपलब्ध राहणार असून ही कृषि प्रदर्शनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. सर्व शेतकरी बंधु-भगिनी, कृषिशी निगडीत मंडळीनी या कृषि प्रदर्शनीचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. धनराज उंदिरवाडे, संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी केले आहे.

CamScanner